# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


NO.: MERC/ADM/RTI/090/2024/002

Dt. 06.01.2025

प्रति,
श्री. भिमराव नागोराव कांबळे,
मु.पो. बनशेळकी, ता. उदगीर,
जि. लातुर - ४१३५१७.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि.०९.१२.२०२४ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज, आयोगाच्या कार्यालयास दि.१७.१२.२०२४ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील मधील माहिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | विज मीटर बिल न भरलेल्या ग्राहकांचे मीटर काढून नेण्यापूर्वी किती दिवस अगोदर ग्राहकास महावितरणने नोटीस देणे बंधनकारक आहे ही माहिती मिळणेबाबत. | मविनिआ (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ च्या विनियम १६.५.१० नुसार, ग्राहकाला विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६ अंतर्गत पुरवठा खंडीत करण्यासाठीची नोटीस विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या पध्दतीने बजावण्यात येते आणि मविनिआ (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ च्या विनियम ७.३ नुसार, ग्राहकाचा वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आल्यानंतर किंवा सहा (६) महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत राहिला असेल तर करार संपुष्टात आला असल्याचे मानण्यात येईल.<br><br>या विनियमांची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. |

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री. अभिजीत चाटुफळे, सह संचालक (प्रशासन व वित्त) / प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५ / ६९ **Email: abhijeet.chatuphale@merc.gov.in**.

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (प्रशासन व वित्त)